दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ९६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.१८ नोव्हेंबर २०२४







## गद्दारीचा पहिला लांडगा लूटमार मंत्री.. उध्दव ठाकरेंचा घणाघात..

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१७, पाटण :** लाडकी बहिणीचे पंधराशे रुपये घरी येईपर्यंत संपून जातात. पैश्यांपेक्षा महिलांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. लूटमार मंत्र्यांना किती सुरक्षा आहे. त्यांच्या घरच्यांना सुरक्षा आहे आणि इथं महिला सुरक्षित नाहीत. गद्दारीचा पहिला लांडगा लूटमार मंत्री आता लोकांना पैसे वाटून पुढच्या निवडणूक ची तयारी करत आहे. या मंत्र्यांने उत्पादन शुल्क खाते घरच्या लग्नात लुटून घेतले. सत्ता आली की सगळी प्रकरण मार्गी लावतो. असा सज्जड दम शंभुराज देसाई यांना त्यांचे नाव न घेता दिला. आम्ही गद्दारांच्या विरोधात लढत आहोत. आपल्यात गद्दारी करणाऱ्यांना मत देऊ नका. भगवा घेऊन पुढे जाणाऱ्या उमेदवाराला पाडण्यासाठी अपक्ष उमेदवार उभे करत आहेत. ही गद्दारी च आहे. या निवडणुकीत हर्षद एकटा नाही मी स्वतः त्याच्या सोबत आहे. असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मल्हारपेठ येथे सभेत बोलताना सांगितले.

मल्हारपेठ येथे शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार भानुप्रताप उर्फ हर्षद कदम यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे बोलत होते. यावेळी मिलिंद नार्वेकर, तेजस ठाकरे, नितीन बानुगडे पाटील, सदाशिव संकपाळ, नरेश देसाई, छाया शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उध्दव ठाकरे पुढे म्हणाले लोकनेते बाळासाहेब देसाई



यांच्याशी ठाकरे घराण्याचे असणारे जुने ऋणानुबंध म्हणून याला शिवसेनेत घेतले तेव्हा काय माहिती कार्ट असं असेल. या मेंढ्यांने शिवसेनेशी गद्दारी केली. गद्दारीचा पहिला लांडगा हाच होता. यांना सगळं दिल होत. गृहमंत्री केल त्यांनी ते पोलिस हाताला धरून सुरत गाठली. भाजपची रित तोडा फोडा राज्य करा आहे. महाराष्ट्र लुटायचे हे काम आहे. पहिली शिवसेना फोडली. मिंदेंना कळत नाही वापरा आणि फेकून द्या. लूटमार मंत्र्यांना सांगा तुमचे सगळे चाळे थांबवा. तुमचे पालकमंत्री नाही तर हे लूटमार मंत्री आहे. आपली सत्ता आली की सगळी प्रकरण मार्गी लावतो. मी ठरवून आज इथं आलो आहे. इथल्या विजयाची जबाबदारी जनतेवरती सोपवायला आलो आहे. शेतकऱ्यांना प्राधान्य, सर्वसामान्य घटकांना न्याय, रोजगार निर्मिती, भूमि पुत्रांना न्याय, मुली, महिलांची सुरक्षा आम्ही करणार आहे. या निवडणुकीत हर्षद एकटा नाही मी स्वतः त्याच्या सोबत आहे.

पाटण तालुक्यात रोजगार नाही. आपत्ती, पुनर्वसन किती प्रश्न आहे. जाब विचारणारे कोणी नाही. शिवसैनिक एकदा नडला.. तर तो भिडला की काय करतो हे या निवडणुकीत पाहा. शिवसैनिकांचा आदेश म्हणून ही ओझी डोक्यावर घेतली होती. ती ओझी आता खाली उतरा. या मतदारसंघात केलयं काम भारी बोर्ड पेक्षा केलीय लूट भारी अस बोर्ड लागले पाहिजे. लाचार, लूटमार, भूईचाटें यांना हा महाराष्ट्र हातात द्यायचा नाही. या निवडणूकीत आख्खा महाराष्ट्र इकडे आहे. लढला तर महाराष्ट्र जिंकेल आणि हरला तरी महाराष्ट्र हरेल. लय भारी ला आणखी भारी करा. असे शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी सांगितले.

शिवसेना ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार हर्षद कदम म्हणाले राजकीय इतिहासातील गद्दारी झाली त्याचे बीज पाटण तालुक्यातून झाली. तालुक्याने निर्धार करा दोन पावले पुढे असणाऱ्यांना चार पावले मागे करणार आहे. हुकुमशाही, बेरोजगारी, भ्रष्टाचारी हे मुख्य मुद्दे आहेत. माझी उमेदवारी जाहिर झाली आणि काहींनी सुज्ञपणाची भाषाशैली आली. मग्रुरी कमी झाली. पंचवीस वर्ष जेवढे मुख्यमंत्री महाराष्ट्रात झाले परंतु त्यांच्या सोबत रंग बदलू हेच ठरले. सर्वांनी हाल अपेष्ठा सहन केल्या. चाळीस वर्ष घराणेशाही त अडकलेले राजकारण तिसऱ्या शक्तीमुळे मोडून पडणार. एकाने मारल्यासारखे करायचे दुसर्याने रडल्यागत करायचे. अडीचवर्ष खांद्याला खांदा लावून काम केले त्यांनी केसाने गळा कापला. सुरुवातीला बेरजेत नसणारा आणि सगळ्यांच्या बेरजां उलटवून टाकणार. दोघे बोलतात विकास झाला नाही. दोन सत्ता असून विकास नाही रोजगार नाही पंन्नास हजार लोक मुंबई ला आहेत. ही वेळ कोणामुळे आली. अडीचवर्ष गद्दारी ज्या माणसाने केली ते आज भूई चापसत आहेत. गल्लोगल्ली फिरत आहेत. सत्ताधार्यांना सतत अंगावर घेत आलो आहे काही जन दिखाऊपणा करत आहेत. तालुक्याचे दोघांना देणेघेणे नाही. सगळं मोडित काढायचे आहे. २६१ विधानसभा शिवसेनेच्या भगव्याखाली येणार हा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पारनेरमधील दहशत संपविण्यासाठी दातेंच्या पाठीशी उभे रहा : डॉ. सुजय विखे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याची दडपशाही संपवण्यासाठी सर्वसामान्य कुटुंबातील काशिनाथ दाते यांच्या पाठीशी पारनेरकरांनी उभे राहिले पाहिजे. लोकसभेला घराणेशाहीचा माझ्या विरोधात प्रचार झाला. ती घराणेशाही होती तर आता पारनेरमध्ये एकाच घरात दोन्ही उमेदवारी आहेत. हे काय आहे. असा सवाल करत निवडणूक सर्वसामान्यांच्या अस्तित्वासाठीची व लोकतंत्र वाचवण्यासाठी आहे. सर्वांनी एकत्र येऊन महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करण्याचे आवाहन माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

**अजित पवारांच्या सभेने तालुक्यातील वातावरण बदलले**

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या यांच्या प्रचारार्थ भाळवणी येथे



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा झाली. या सभेला मोठ्या संख्येने गर्दी जमली होती. सभेमध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती. अपक्ष उमेदवार, मधुकर उचाळे, सुजित झावरे आदी नेते व्यासपीठावर उपस्थित होते.

पारनेरकर दाते यांना निवडून आणण्यासाठी सक्रिय झाले असल्याने भाळवणी येथील सभा ही पारनेर विधानसभा निवडणूकमध्ये काशिनाथ दाते यांच्या विजयासाठी टर्निंग पॉईंट ठरण्याची शयता असल्याचे बोलले जात आहे. दाते-लंके-कार्ले यांच्यात चुरस पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांना माजी नगराध्यक्ष अपक्ष उमेदवार विजय औटी यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. पाठिंबा देण्यापूर्वी औटी यांनी मोठे शक्ती प्रदर्शन केले. सुरुवातीला पंचरंगी दिसत असलेली पारनेर विधानसभा मतदारसंघातील निवडणूक ही शेवटच्या टप्प्यात आता तिरंगी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**विजय औटी यांचा ५ हजार युवकांच्या उपस्थितीत पाठिंबा**

महायुतीचे राष्ट्रवादीचे उमेदवार काशिनाथ दाते यांचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. भाळवणी येथिल सभेत नंतर तालुक्यातील राजकारणाला कलाटणी मिळण्याची शक्यता आहे. अपक्ष निवडणूकित उतरलेले पारनेर शहराचे माजी नगराध्यक्ष विजय औटी यांनी मोठे शक्ती प्रदर्शन करत पाच हजार युवकांच्या उपस्थितीमध्ये अजित पवार व सुजय विखे पाटील यांच्या शब्दाला प्रमाण मानून राष्ट्रवादीचे उमेदवार काशिनाथ दाते यांना भाळवणी येथिल प्रचारसभेत पाठिंबा दिला आहे. त्यामुळे दाते यांची ताकद वाढली असल्याचे बोलले जात आहे.

## राणी लंके यांच्या प्रचार फेऱ्यांना नगर तालुक्यात प्रतिसाद !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, (अहिल्यानगर) :** महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्या नगर तालुक्यातील चौथ्या दौऱ्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. गुरूवारपासून सुरू करण्यात आलेल्या प्रचार फेऱ्यांचे नागरिकांकडून गावागावामध्ये उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे.

पुष्पवृष्टी, फटाक्यांची आतिषबाजी, पुष्पवृष्टी तसेच वाजत गाजत राणी लंके यांच्या प्रचारफेऱ्यांना प्रतिसाद मिळत आहे. राणी लंके यांची उमेदवारी निश्चित होण्यापूर्वीच त्यांनी आरोग्य यज्ञाच्या माध्यमातून गावागावांशी संपर्क साधला होता. त्यानंतर बुथ कमिटयांच्या माध्यमातून त्या दुसऱ्यांदा गावांमध्ये पोहचल्या. उमेदवारी निश्चित झाल्यानंतर त्यांनी तिसऱ्यांदा घोंगडी बैठकीच्या माध्यमातून नागरीकांशी संवाद साधला. नागरीकांच्या समस्या समजाउन घेत त्याची नोंद घेऊन त्या समस्या दुर करण्याची ग्वाही दिली. ज्या समस्या तात्काळ माग लावणे शक्य होते त्या माग लावण्यात आल्या. घोंगडी बैठकांच्या माध्यमातून थेट मतदारांपर्यंत पोहचल्यानंतर आता चौथ्यांदा राणी लंके या प्रचार फेऱ्यांच्या माध्यमातून मतदारांना सामोऱ्या जात आहेत. गुरूवारी त्यांनी नगर तालुक्यातील निमगांव वाघ येथून सकाळी प्रचार फेरीस प्रारंभ केला. निमगांव वाघामध्ये त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर नेप्ती, निंबळक, नव नागापुर, वडगांव गुप्ता, शिंगवे नाईक, इस्मालपुर, देहरे, नांदगांव या गावांना भेटी देत नागरीकांशी संवाद साधला. शुक्रवारी सकाळी कामरगांव येथून प्रचार फेरीस सुरूवात करण्यात आली. त्यानंतर चास, अकोळनेर, अरणगांव, वाकोडी, देउळगांवसिध्दी, घोसपुरी, सारोळा कासार या गावांमध्ये प्रचार फेऱ्यांच्या माध्यमातून राणी लंके व त्यांच्या समवेत महिलांनी मतदारांशी संवाद साधला.

**मतदारांच्या प्रेमाने भारावले !**

गेल्या तीन दिवसांपासून माझ्यासह सहकारी भगिनी नगर तालुक्यातील गावांमध्ये प्रचार फेऱ्यांच्या माध्यमातून मतदारांना सामोरे जात आहोत. या प्रचार फेऱ्यांच्या निमित्ताने आम्ही चौथ्यांदा नागरीकांशी संवाद साधत आहोत. गावागावांमध्ये आम्हाला मोठा प्रतिसाद मिळत असून नागरिकांकडून प्रेम मिळत आहे. त्यांच्या या प्रेमामुळे मी भारावून गेले आहे.

**--राणीताई लंके, महाविकास आघाडी उमेदवार**

लंके परिवाराच्या योगदानाचे फलित ! खासदार निलेश लंके हे २४ तास ३६५ दिवस नागरिकांसाठी उपलब्ध असतात. त्यांच्या पश्चात आमचे संपूर्ण कुटुंब मतदार संघातील नागरिकांच्या सुख दुःखात सहभागी होण्यासाठी तत्पर असते. जीवा भावाची माणसं हीच लंके परिवाराची खरी संपत्ती आहे. मतदारसंघात आम्हाला जो प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे तो खरा खा. निलेश लंके यांच्या माध्यमातून आमच्या परिवाराने दिलेल्या योगदानाचे हे फलित आहे.

**-- राणीताई लंके**

## मतदान दिनाच्या ४८ तास अगोदर राजकीय सभा घेण्यास बंदी

**दि.१७, बुलडाणा :** भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक विधानसभा निवडणूक-२०२४ ची घोषणा केली असून जिल्ह्यात आदर्श आचार संहिता लागू झाली आहेत. जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहणे आवश्यक असल्याने तसेच विधानसभा सार्वत्रिक निवडणूक निर्भय व निपक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) नुसार जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी मतदानाचा दिनांक व मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर म्हणजे दि. १८ नोव्हेबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेनंतर कोणत्याही प्रकारच्या राजकीय सभा घेऊ नये, असे आदेश दिले आहे.

तसेच राजकीय नेते, कार्यकर्ते सदर मतदारसंघाचे मतदार नसतील अशा व्यक्तींनी मतदानाच्या निश्चित केलेल्या दिनांकाच्या ४८ तासाच्या अगोदर सदर मतदारसंघ सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहे. सदर बंदी आदेश सर्व विधानसभा मतदारसंघात दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजीचे सायंकाळी ६ वाजल्यापासून ते दि. २० नोव्हेंबर २०२४ चे रात्री २२ वाजेपर्यंत लागू राहील. सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती मुंबई पोलिस अधिनिमय, १९५१ चे कलम १३५ व भारतीय नागरी सुरक्षा न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ नुसार कार्यवाहीस पात्र राहिल, असे जिल्हादंडाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी कळविले आहे.

## वरळीमध्ये आदित्य ठाकरेंना अनोखे आव्हान देणाऱ्या खुर्च्या

**दि.१७, मुंबई :** मतदानाला अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असून वरळी मतदारसंघात विद्यमान आमदार आणि शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) उमेदवार आदित्य ठाकरे यांना विरोधकांनी अनोखे आव्हान दिले आहे. शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) कार्यकर्त्यांनी वरळीत ठिकठिकाणी ठाकरे यांना भविष्याच्या चर्चेचे आव्हान दिले आहे. अशी पत्रके लावलेल्या खुर्च्या जागोजागी ठेवल्या आहेत.




आदित्य ठाकरे वरळी मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवडणूक लढवत असून त्यांची कोंडी करण्यासाठी विरोधकांनी तयारी केली आहे. शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या या मतदारसंघातील लढत लक्षवेधी ठरणार आहे. या मतदारसंघात आदित्य ठाकरे यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांचा जोरदार प्रचार सुरू आहे. शिवसेनेने (एकनाथ शिंदे) खासदार मिलिंद देवरा यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. वरळीमधील अनेक ठिकाणी रविवारी सकाळी काही विशिष्ट मजकूर लिहिलेल्या खुर्च्या निदर्शनास आल्या. वरळीच्या भविष्याच्या चर्चेचे आव्हान आदित्य स्वीकारणार का असा सवाल करणाऱ्या या खुर्च्या लक्ष वेधून घेत होत्या.

## वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार !

**दि.१७, चंद्रपूर :** शेतशिवारात शेळ्या चराईसाठी घेऊन गेलेल्या एका शेतकऱ्यावर वाघाने हल्ला करून ठार केले. ही घटना रविवार (ता. १७) सायंकाळी चार वाजताच्या सुमारास गणेशपूर पातळी येथे घडली. मृत शेतकऱ्याचे नाव चंद्रभान गणपत लोखंडे (वय ७२) असे आहे. या घटनेने गावात भीतीचे वातावरण पसरले आहे. ब्रह्मपुरी तालूका मुख्यालया पासुन २५ कि.मी. अंतरावर जंगलव्याप्त भागात गणेशपूर पातळी हे गाव आहे. या गावातील चंद्रभान लोखंडे हे गावापासून सुमारे एक कि.मी. अंतरावर शेतात घरच्या शेळ्या चराईसाठी घेऊन गेले होते. तेंव्हा झुडपात दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. वाघ त्यांना सरपटत काही अंतरापर्यंत घेऊन गेला. सायंकाळी होऊनही चंद्रभान लोंखडे घरी परतले नव्हते. त्यामुळे लोखंडे कुटुंबीयांसह ग्रामस्थांनी त्यांचे शेत गाठले. परिसरात शोधमोहीम राबवित असताना शेतापासून काही अंतरावर चंद्रभान गणपत लोखंडे यांचा मृतदेह दिसून आला. त्यानंतर या घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली. माहिती मिळताच ब्रह्मपुरी वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन नरड हे आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनाकरिता ब्रम्हपुरी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

## नाशिक जिल्ह्यात दोन दिवसात ५७ लाखांचा मुद्देमाल जप्त




**दि.१७, नाशिक :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक ग्रामीण पोलिसांची अवैध व्यवसायाविरोधात जिल्ह्यात व्यापक स्वरूपात मोहीम सुरु आहे. याअंतर्गत दोन दिवसात नाशिक ग्रामीण आणि मालेगाव परिसरात केलेल्या कारवाईत अवैध दारू, हत्यार, अमली पदार्थ, गुन्ह्यात वापरलेली वाहने असा ५७ लाख, सहा हजार, ३६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नाशिक ग्रामीण पोलीसांच्या वतीने सुरू असलेल्या मोहिमेत जिल्ह्यात ५७ संशयितांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले.

या कारवाईत १४९.६७ लिटर देशी, विदेशी दारू तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन, तयार गावठी दारू व इतर साहित्य असा पाच लाख, १४ हजार १६५ रुपयांचा अवैध मद्यसाठा जप्त करण्यात आला. घातक शस्त्र बाळगणाऱ्यांविरूध्द पाच गुन्हे दाखल करण्यात आले. त्यामध्ये देशी बंदूक, चार तलवार, कोयता असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. मालेगाव शहरातील पवारवाडी पोलीस ठाण्यात संशयिताच्या ताब्यातून १८ हजार रुपयांच्या अल्प्राझोलम गोळ्या जप्त करण्यात आल्या.

## संपादकीय



### धारावीविषयी नवा दृष्टिकोन हवा!

धारावी पुनर्विकास प्रकल्प बांधकाम व्यवसायाचा अनुभव नसणाऱ्या आणि मुंबईबाहेरील अदानी उद्योग समूहाला देण्यात यावा की नाही, यावर सध्या बरीच मतमतांतरे दिसतात. या प्रकल्पामुळे अदानी उद्योग समूहाला प्रकल्पाची ५४० एकर जमीन, मुंबईमधील विविध ठिकाणच्या ५०० एकर जमिनी, विकास करात सूट आणि हस्तांतर होणाऱ्या चटई क्षेत्रात वाटा मिळाला आहे. पुनर्विकासाचे अनेक उत्तम पर्याय उपलब्ध असताना ते डावलून मुंबईच्या होऊ घातलेल्या या लुटमारीला जाणत्या मुंबईकरांचा पाठिंबा नाही. पण केवळ हा प्रकल्प अदानी समूहाकडून काढून घेणे मुंबईकरांच्या भविष्याच्या दृष्टीने का पुरेसे नाही हेही पाहायला हवे

सुमारे ३० वर्षांपूर्वी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी झोपडपट्टीमुक्त मुंबईचे स्वप्न पाहिले. अर्थव्यवस्था, शहरांबद्दलचे अपुरे ज्ञान आणि प्रशासकीय अनुभवाचा अभाव यामुळे ते स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकले नाही. याच चुकांच्या पायावर शिंदेंच्या नेतृत्त्वाखालील युती सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानींना सोपविला. मुंबईकरांनी यामागचे राजकारण आणि अर्थकारण समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी काही वर्षे मागे जाऊन परिस्थिती समजून घ्यावी लागेल.

मुंबई स्वतंत्र महाराष्ट्राची राजधानी झाल्यापासून येथील अर्थव्यवस्था झपाट्याने वाढू लागली. सत्तरच्या दशकात मराठवाड्यात महाप्रचंड दुष्काळ पडला. या दोन कारणांमुळे स्थलांतरितांचे लोंढे मुंबईभर पसरू लागले. तेव्हा स्थलांतरितांना विरोध हा राजकीय मंत्र असल्याने त्यांना वाढत्या शहरात सामावून घेण्याचा विचार झाला नाही. धोरणाच्या अभावाचा गैरफायदा घेत जमीन माफियांनी झोपडवस्त्या वसवून स्थलांतरितांना आश्रय दिला. कायदा आणि शासकीय बळाचा वापर होऊनही अशा वस्त्यांत वाढ होतच राहिली. मोक्याच्या जागी, खाडी आणि दलदलीच्या जमिनींवर धारावी कोळीवाड्यालगत असलेल्या जमिनीवर अनधिकृत उद्योग आणि वस्ती प्रस्थापित झाली ती याच काळात.

अशा राजकीय-प्रशासकीय हतबलतेच्या काळात नाईलाजाने झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाचा विचार सुरू झाला. १९८५ साली राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने धारावी झोपडवस्ती पुनर्विकासासाठी १०० कोटी रुपयांचा निधी दिला. रहिवाशांनी गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या. म्हाडाने जमीन विनामोबदला दिली. मालकी हक्काच्या घरासाठी रहिवाशांनी बांधकाम खर्चात वाटा उचलला. रहिवाशांचा सामूहिक आर्थिक सहभाग आणि म्हाडाच्या आर्थिक, तांत्रिक प्रशासकीय मदतीतून दहा वर्षांत ३८०० घरे बांधली गेली. लोकांच्या गरजा आणि ऐपत या दोन्ही निकषांचा विचार करून याच धर्तीवर इतर झोपडपट्ट्यांसाठी शासनाने 'स्लम रिडेव्हलपमेंट स्कीम' तयार केली. ही सर्व प्रक्रिया आशादायक असली तरी संथ होती. परंतु त्याला अचानक खीळ बसली.

दहा वर्षांत- १९९५ मध्ये मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे आश्वासन देत महाराष्ट्रात शिवसेनेने सत्ता मिळवली. बाळासाहेब ठाकरे यांचे हे स्वप्न वास्तवात आणण्यासाठी सरकारने धोरण आखले. प्रत्येक पात्र झोपडी धारकाला २५० चौ. फुटांचे मालकी हक्काचे घर विनामोबदला देण्याचे आश्वासन दिले गेले. खासगी विकासकांना वाढीव चटई क्षेत्राच्या बांधकामातून रास्त नफा मिळेल आणि त्यातून ते झोपडीवासीयांसाठी घरे बांधतील असा साधा-सोपा हिशेब त्यामागे होता. शासनाला आणि झोपडीवासीयांना पैसे खर्च करावे लागणार नव्हते आणि तरीही झपाट्याने मुंबई झोपडपट्टीमुक्त होईल अशी अपेक्षा तेव्हा होती. सर्वांना लाभ देणारी ही योजना आकर्षक वाटली नसती तरच नवल. त्यामुळे तेव्हा त्याला पुरेसा राजकीय विरोध झाला नाही.

# तुळशीचे विवाह झाले, आता..?

हिंदू पंचांगानुसार कार्तिकी पौर्णिमेला तुळशीचा विवाह मनोभावे गावोगावी, घरोघरी लावला जातो. आणि त्यानंतर आपले विवाह सुरू होतात. पण अनेकांच्या विवाह होण्यासाठी अनेक अडथळे निर्माण होत आहेत. प्रत्येक गावात तिशी ओलांडून गेलेले अनेक तरुण-तरुणी एखाद्या चातक पक्ष्यासारखी विवाहाची वाट पाहत आहेत.आपला जोडीदार शोधण्या साठी अनेक प्रयत्न करत आहेत. मध्यस्थी करणारे लोक चिरीमिरी घेऊन विवाह जुळून देण्याच्या सध्या प्रयत्नात आहेत.



पण अलीकडच्या काळात तर विवाह होऊन सुद्धा अनेक ठिकाणी तीन दिवसातच नवरी पोबारा करत आहे. विवाह म्हणजे दोन घराण्याचे मिलन असते. त्यात संस्कार असतात. मानवी नीतीमत्ता असते. सामाजिक बांधिलकी नुसार प्रजनन व्हावे. तेव्हा ते समाजामध्ये सर्वत्र ग्राह्य धरले जाते. परंतु आता परिस्थिती बदललेली आहे. याबद्दल त्या परिस्थितीनुसार विवाह होण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत झाले आहेत. वय झाले असले तरीही विवाह जुळत नाहीत. या कारणामुळे अनेकांचे विवाह रखडले आहेत. अनेक तरुण व्यसनाधीन झाल्यामुळे सुद्धा विवाह होत नाहीत. आजकाल तरुण विवाहासाठी इच्छुक असले तरी वधू पक्षाकडील लोक शेती नाही? काम करत नाही? म्हणून मुली देण्यासाठी तयार नाहीत. आपली मुलगी शहरात असावी; तिच्याजवळ फक्त तिचा पती असावा, इतर नातेवाईक नको ?असे सुद्धा काही अतिहुशार मंडळी शोध लावत आहेत.या सगळ्या कारणामुळे विवाहामध्ये अडथळे निर्माण होऊन काही जणांचे तारुण्य संपत आहे. अशा गोष्टी ऐकायला मिळत आहेत. कोणत्याही भागातून मुलगी मिळावी असे काही जणांचे अपेक्षा आहे.परंतु वधूपिता आपली मुलगी चांगल्याच घरी देण्यासाठी तयार आहे. नोकरीच्या शोधात अनेक तरुण आपले विवाहाचे वय गमावून बसले आहेत तुमच्या व्यवसायाचा किंवा नोकरीचा तुमच्या विवाह संस्थेशी काही संबंध नाही. तुझ्या दोन टक्केच्या नोकरीसाठी माझा लाखोची जवानी निघून जात आहे. असे एका ठिकाणी खरोखर म्हटलेले आहे. अनेक ठिकाणी मंत्र्यांना सुद्धा तरुणाने फोन केलेला आहे. आमचे विवाह जुळत नाहीत म्हणून काही ठिकाणी बाशिंग बांधून घोड्यावर बसून मिरवणूक सुद्धा काढण्यात आलेली आहे. तसेच अनेक ठिकाणी वधू वर केंद्र सुद्धा स्थापन करून विवाह जुळवण्यासाठी आटोकाठ प्रयत्न केले जात आहेत. एवढे करून सुद्धा अनेक तरुण-तरुणी विवाहापासून दूर आहेत हे कुठेतरी थांबणं गरजेचं आहे. मानसिकता बदलून घेणे हे गरजेचे आहे.जर यावर कोणती चर्चा झाली नाही तर अघटीत घडू शकते. त्याची दाट शक्यता असते. आठ प्रकारचे विवाह भारतीय संस्कृतीमध्ये सांगितले आहेत. त्यामुळे विवाह चांगल्याच पद्धतीने झाले पाहिजेत. असे माझे वैयक्तिक मत आहे.जोडीदार चांगला असेल तर आयुष्याचं सोनं होते. जोडीदारा बरोबर बिघाड निर्माण झाला. संशय वृत्ती निर्माण झाली. तर आयुष्याची रांखरांगोळी होऊन कुटुंब उध्वस्त होतात. व्यसनाधीनता बाहेर ख्यालीपणा अशा गोष्टीमुळे वितंडवाद निर्माण होतात. म्हणून चांगले जीवन जगण्यासाठी संस्कार हे घरातले चांगले असावे लागतात. सुशिक्षित मुली अशिक्षित लोकांच्या घरी देण्याची सध्या वेळ आली आहे. त्यामुळे घरातील कुटुंबातील लोकांबरोबर यांचे म्हणावे तसे सूत जुळत नाही हे जीवन सुंदर आहे. जगते वेळेस थोडा त्रास ही सहन करावा लागतो. परंतु सध्या काही महिला सुनांना कुठे होतीस? कुठे गेलीस? एवढा उशिरा का आलीस? केस कमी का झाले? चप्पल उंच टाचेची का घातली? कपडे कमी का वापरले ? तुला फक्त नवराच लागतो? तुझ्या आईनं -वडिलांनी असेच तुला शिकवले का? तुमचे खानदान...

असेच आहे का? काळी, बुटकी, सटवी, असे अपशब्द वापरून मनाचे खच्चीकरण करतात आणि नंतर सून नांदत नाही म्हणून सर्वत्र बोभाटा करत सुटतात हे अनेक खेडोपाडी आजही चालू आहे.

असे टोमणे मारून आपल्या सुनेला शारीरिक, मानसिक छळ करून पळून लावतात हे कटू सत्य आहे. मुलीच्या संसारात नातेवाईकांनी जास्त नाक खूपसू नये.अनेक वेळेस फोन करून सुद्धा मानसिक स्वास्थ्य बिघडून टाकतात. त्यामुळे लग्न जमताना जसे गोड बोलले जाते, तसे काही काळा नंतर त्रास दिला जातो. म्हणून सुज्ञ व्यक्तीने सर्व पाहून व्यवस्थित विवाह जुळवावेत ,एक बार विवाह झाला की सगळं चांगलं समजून घेऊन गुण्यागोविंदाने माझा सोन्याचा संसार म्हणून करावा. म्हणजे कोणालाही त्रास होत नाही. काही लोक मध्यस्थी करणाऱ्याला शिव्या देतात. त्याचं काम त्यांनी केलेले असते. परत आपण कसे वागावे ते आपल्यावर अवलंबून असते. हे आता कोण कोणाला सांगावे? कळ लावण्याचे कारण मोबाईल सुद्धा आहे. विवाह जुळते वेळेस कारणीभूत आहे. ताबडतोब एकमेकांना फोटो पाठविणे. काळी गोरी पाहणे, लगेच मी ही पाहून आलो होतो.तुम्हाला काय म्हटले? मला काय म्हटले ? हुंडा देतो काय म्हटले? मुलगा शहरात राहील असे अनेक चुकीचे प्रश्न विचारून विवाह संस्थेला अडचणीत आणतात. मनाची तयारी ठेवून विवाह होते वेळेस सुज्ञ व्यक्तींनी मदत करण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे विवाह ताबडतोब जुळतात.

फार मोठा जनसमुदाय जमला म्हणजे विवाह चांगला झाला असा अजिबात नाही. विवाह करून तीन तीन वर्षे झाले. त्यामुळे अंगावरील कर्ज काही जणाचे फिटत नाहीत.परत अंगावरील दागिने विकून ते कर्ज मिटवावे लागते.

हे मी समाजातील लोकांच्या बोलण्यातून ऐकतो. विवाहात काढलेल्या फोटो, व्हिडिओ कॅसेट एक मुलं होईपर्यंत सुद्धा काही जणांनी घेऊन गेले नाहीत. अक्षर:शा ते स्टुडिओ मध्येच धुळ खात पडून आहेत. यापेक्षा लाजिरवाणी गोष्ट कोणती? त्यासाठी योग्य वयात योग्य पाहुण्यासोबत समजदारपणाने विवाह केल्यास सर्वांची मानसिकता चांगली राहते. आई-वडिलांची मान मर्यादा सुनेने व मुलांनी सारखीच ठेवावी. ज्येष्ठांचा आदर करावा. ज्येष्ठांना सन्मानाने वागवावे. असे न होता अनेक घरांमध्ये सकाळपासून संध्याकाळपर्यंत ज्येष्ठांना टोमणे मारण्याचा प्रकारही उघडकीला येत आहेत. वृद्धाश्रमाची संख्या वाढत आहे. हे सगळे चुकीच्या पद्धतीचे परिणाम आहेत. गरीब आणि श्रीमंत यामध्ये भेद न होऊ देता विवाह संस्था टिकून राहाव्यात. दागिन्यावरून अनेक घरी वादविवाद निर्माण होतात. आमचा मान सन्मान केला नाही? आमच्या मनासारखी वागले नाही? असे काही तरी काढून वाद निर्माण करतात हे सगळं बाजूला सारून विवाह संस्था मजबूत करण्यासाठी सर्वांनी सुसंस्कृतपणे वागावे. लिंग गुणोत्तरानुसार मुलांच्या संख्येनुसार मुली कमी आहेत. कारण वंशाचा दिवा हा मुलगा असतो.म्हणून चुकीच्या पद्धतीने वागले जात आहे. त्याला अनेक घटक जबाबदार आहेत. त्यामुळे मुलींची कमतरता पडल्यामुळे मुलांचे वय झाले असले तरी मुली मिळत नाही हे एक महत्त्वाचं कारण आहे. विवाह झाल्यानंतर तीन-चार महिन्यात सुद्धा घटस्फोट होत आहेत हे विकृतीचे व असुसंस्कृतपणाचे लक्षण आहेत. घरातील भांड्याचा आवाज घरातच राहू द्यावा. तो रस्त्यावर येऊ देऊ नका.म्हणजे सुखी कुटुंब असे आपणाला म्हणता येईल. नसता ही काय पीडा झाली म्हणून रोज बोटे मोडण्याची वेळ कोणावरही येऊ नये ही अपेक्षा...

**- प्रा. बरसमवाड विठ्ठल गणपत**

## रिक्षात गहाळ बॅगमधील २ लाख १० हजाराचा मुद्देमाल हस्तगत करून महिलेला सुपूर्त

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**
**दि.१७ कल्याण (ठाणे) :**

कल्याण पश्चिम ०३ रोजी आपल्या गावावरून एक महिला नाव शुभांगी अरुण पराड वय २४ कल्याण स्टेशन एसटी स्टँड या ठिकाणी रिक्षा पकडून कल्याण पूर्वेला असलेले मेट्रो मॉल या ठिकाणी उतरले असता आपले बॅग मधील सोन्याचे डबे रिक्षामध्ये विसरले असता याचे तक्रार महात्मा फुले पोलीस स्टेशन या ठिकाणी नोंदविण्यात आले.



त्या डब्यामध्ये सोन्याचे मुद्देमाल किंमत २,१०,०००/-असून याचे शोध लावण्यासाठी महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांचे मार्गदर्शनाखाली त्यांनी आपल्या पोलीस ठाणे मधील तपास अधिकारी यांना नेमून आदेश देण्यात आले.

या तपासासाठी नेमण्यात आलेले अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल भुजबळ आणि अंमलदार यांनी सीसीटीव्ही तंत्रज्ञान साहाय्याने १२ दिवसाच्या शोधून त्या महिलेचे स्वाधीन करण्यात आले या उत्तम कामगिरीसाठी त्या महिलेने पोलीस विभागाचे प्रशंसा करून धन्यवाद व्यक्त केले.

### मतदाना..

आखाड्यात उतरले
कितीतरी उमेदवार
निवडणूक गावाची
इथे दिसतो संस्कार

कृतीकृतीत दिसावा
खरोखर सद् विचार
ग्राम मातीचे आम्ही
तसाच शुध्द आचार

प्रलोभन बळी नको
ना हो कुणी लाचार
शब्दा शब्दा किंमत
करत असता प्रचार

लवलेश उन्मादाचा
जिंकताही ना संचार
हरलेल्याने करू नये
अपशब्दाचा उच्चार

सत्ता पवित्र तिर्थक्षेत्र
न हो कुठला दुराचार
राजकारण फलका
झळकावे रे सुविचार

मतदाना करा जरूर
दावा योग्य अधिकार
नका करू टाळाटाळ
घडवा खरा चमत्कार

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## मतदान केंद्रावरील सुविधा कामांचा पालिका आयुक्तांनी घेतला आढावा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, नवी मुंबई :** २० नोव्हेंबर रोजी होत असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील १५० ऐरोली व १५१ बेलापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघातील १७६ ठिकाणी असलेल्या ८३१ मतदान केंद्रांवर मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे याकरिता आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या जातील याकडे बारकाईने लक्ष देण्याचे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आश्वासित किमान सुविधा पूर्ततेबाबत विशेष बैठक घेत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड तसेच इतर विभागप्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता प्रत्यक्ष व दृकश्राव्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



ऐरोली मतदारसंघात ७९ ठिकाणी ४४७ मतदान केंद्रे व बेलापूर मतदारसंघात ९७ ठिकाणी ३८४ मतदान केंद्रे असून १५० ऐरोली मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुचिता भिकाने तसेच १५१ बेलापूर मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी पाटील यांच्या नियंत्रणाखाली सर्व मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा पुरविण्यात येत आहेत.

आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली एनएमएमटी बसेस व बसस्टॉपवर बॅनरद्वारे मतदानाकरिता आवाहन करण्यात आले आहे. ठिकठिकाणी पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग, सेल्फी स्टँड, स्वाक्षरी फलक लावण्यात आले आहेत. एनएमएमटी बसेस, कचरा वाहतुकीच्या घंटागाड्या, नाट्यगृह येथे जनजागृतीपर ध्वनिफिती प्रसारित करण्यात आल्या आहेत. तसेच चित्रपटगृहांमध्ये व्हिडिओ क्लिप्स, सोशल मिडीया हँडल्सवरून ग्राफिक्स, तसेच मान्यवर कलावंतांच्या व्हिडिओ क्लिप्स प्रसारित करण्यात येत आहेत. पथनाट्य, फ्लॅश मॉब, मॅस्कॉट, सायकलवरून जनजागृती असे वेगळे उपक्रमही राबविले जात आहेत.

मतदारांना त्यांचा मतदार क्रमांक व मतदान केंद्र समजावे यादृष्टीने चिठ्ठ्या व माहितीपत्रकाद्वारे मतदान केंद्राचा क्यू आर कोड घरोघरी पोहोचविला जात आहे. सोसायट्यांमध्येही क्यू आर कोड प्रसिध्द केले जात आहेत.

मतदान केंद्राच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, लाईट व पंखे, मंडप, बैठक, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प आणि व्हिलचेअर व्यवस्था, पार्कींग व्यवस्था, फलक प्रदर्शित करणे, रांगांच्या व्यवस्था, अशा विविध बाबींकडे बारकाईने लक्ष देण्याचे निर्देश आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिले.

यापूर्वी काही मतदान केंद्रांची आयुक्तांनी पाहणी केली असून, बैठकीत दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने निवडणूकीपूर्वी पुन्हा पाहणी करणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. मतदान केंद्रांवर येणाऱ्या मतदारांना कोणत्याही प्रकारची असुविधा होऊ नये याकडे आयुक्त बारकाईने लक्ष देत आहेत.

तरी नवी मुंबईतील ऐरोली आणि बेलापूर या दोन्ही मतदार संघातील सर्व मतदारांनी आपले हक्काचे मत वाया जाऊ न देता २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायं. ६ या वेळेत नक्की मतदान करावे आणि आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# गुहागर विकासाचे तोरण बांधण्यास प्रमोद गांधी सज्ज !

## महायुती, महाविकास आघाडी समोर मनसेची लक्षवेधी लढत...

**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.१७, गुहागर :**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षप्रमुख राजसाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रचं विकास आराखडा जाहीर केल्यानंतर महाराष्ट्रात सत्ता बदलाचे वारे वाहू लागले आहेत. सर्वत्र मनसेमय वातावरण निर्माण झाले आहे.**



**परिवर्तनाची नांदी..!**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीची रणधुमाळी सुरू आहे,२६४ गुहागर विधानसभा मतदारसंघात यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत स्थानीक उमेदवार प्रमोद सिताराम गांधी शाश्वत विकासाचे व्हीजन घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून,येथे प्रस्थापित पक्ष,महायुती ,महाविकास आघाडी, अशा बलाढय शक्ती समोर महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वबळावर लढत देत आहे, २६४ गुहागर विधानसभा मतदारसंघ गेली ६० वर्षे परिवर्तनापासून लांबच राहिलं,आताच्या संगणकीय युगात आरोग्य,स्पर्धा परीक्षा,बेरोजगार,पाणी,रस्ते,शिक्षण, वीज,क्रीडा, पर्यटन,अशा अनेक मूलभूत आणि अत्यावश्यक सोयी, सुविधांनी अपूर्णच राहिलेला गुहागर तालुका सह मतदारसंघ नवनिर्माण करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राजसाहेब ठाकरे यांनी यांनी बदल संधीचा बहुमान दिलाय, २६४ गुहागर विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार प्रमोद गांधी यांच्या रूपाने गुहागर मतदारसंघातील जनतेसमोर एक नवीन पर्याय उभा आहे.

गुहागर मतदारसंघ राजकीय क्षितीजावर गेली कित्येक वर्षे घराणेशाहीचीच सत्ता केंद्रीत राहिलेली आहे. आजतागायत याचा अनुभव सर्वसामान्य जनतेला आलेला असूनसुध्दा परिवर्तनाची लाट येथे निर्माण झालेली नाही. वर्षानुवर्षे राजकीय प्रस्थापितांनी येथील परिवर्तन कधीच होऊ दिले नाही. सर्वसामान्य जनतेच्या भावनांशी प्रसंगी साम, दाम, दंड, भेद यांचा धाक दाखवून आपली येथे सत्ता राखली. त्यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्याला, एखाद्या तरुणाला येथे सत्तेची कधीच संधी मिळाली नाही. आजही हीच परिस्थिती असल्याने गुहागर विधानसभा मतदारसंघाचा बदल घडविण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना मतदार राजा जागा हो, विकासाचा धागा हो हे घोष वाक्य घेऊन राजकीय मैदानात उतरली आहे. गुहागर शाश्वत विकासाचे व्हीजन घेऊन प्रमोद गांधी यांनी आपला वचननामा जाहीर केला असून

सन्मा. राजसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मनसेने माझ्यासारख्या उमद्या नेतृत्वाला येथील परिवर्तन घडविण्यासाठी उमेदवारी दिली आहे. माझ्या घराण्याला कुठलाही राजकीय वारसा नाही. एका सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेला एक ग्रामीण भागातील मी तरुण आहे. मी आहे बहुजनांचा, नाही कुठल्या समाजाचा अशी सर्वसमावेशकता बाळगून मी निवडणूक रिंगणात उतरलो आहे.

यासाठी मला सर्वसामान्य बहुजन मतदारांचे पाठबळ अपेक्षित आहे. मतदारांनी आता जागे होऊन मनसेच्या रुपाने विकासाचा धागा व्हावे एवढीच आमची आग्रही विनंती आहे. आपल्या तालुक्याचा विधानसभेत विकास व्हावा, उत्तम सोयी सुविधा असाव्यात, जनतेचे प्रश्न तातडीने सोडवले जावेत आणि विधानसभा दर्जाची व्हावी ह्या साठी मी एक ध्येय ठरवलंय ज्याचा मी सतत पाठपुरावा करत असतो, आपल्या परिसरातील जुन्या विकासाचा प्रश्न असो किंवा तरुणांच्या शिक्षणाचा, युवकांच्या नोकरी धंद्याचा प्रश्न असो महिलांच्या सुरक्षेचा विषय असो की बाळगोपाळाचा उज्वल भविष्याचा मार्ग असो प्रत्येक विषयांकडे गाभीर्याने लक्ष देत काम करण्याचा मी प्रामाणिक पणे प्रयत्न करतो. गुहागर विधान क्षेत्रातून निवडणूक लढवीत आहे गुहागर मध्ये अनेक सुधारणा करण्यासाठी विविध उपक्रम राबविन यासाठी गुहागर मधील जनतेचं जीवनमान अधिक उंचवण्यासाठी आणि आपल्या गुहागर परिवाराचा ऋणानुबंध दृढ करण्यासाठी मला तुमचे आशीर्वाद आणि साथ हवी आहे, पुढील ५ वर्षातही आपल्याला मिळून असंच गुहागर विधानसभेतील जनतेला पुढे घेऊन पुढे जायचं आहे, आणि सर्वोत्तम करायचं आहे. सत्तेत नसतानाही मी मागील वर्षांपासून गुहागर विधानसभेत सातततत्याने गुहागरच्या सेवेत कार्यरत राहिलो व राहणार हा माझा शब्द आहे.असे प्रमोद गांधी यांनी वचननाम्यात म्हटले आहे.

गुहागर मतदारसंघात विद्यमान आमदारांकडून दळणवळणाचे प्रमुख साधन असलेले ग्रामीण रस्ते चांगल्या दर्जाचे असल्याचे सांगितले जाते मात्र, आज प्रत्यक्षात माहिती घेतल्यास विशेष करुन पावसाळ्यात खराब रस्त्यांमुळे एसटी सेवा बंद ठेवण्याची वेळ गुहागर आगारावर आलेली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य प्रवाशी व शालेय विद्यार्थ्यांचे मोठे हाल झालेले आहेत. मात्र, हे मुद्दे दुर्लक्षित होताना दिसून येत आहेत.गुहागर तालुक्याच्या पर्यटन स्थळाकडे जाणारा गुहागर-विजापूरसारखा राष्ट्रीय महामार्ग गेल्या ५ वर्षात पुरता उखडला आहे. या रस्त्याची काही वर्षातच दुर्दशा झालेली असताना यावर सत्ताधाऱ्यांनी ठेकेदाराविरोधात कोणतेही आक्रमक पाऊल उचलले नाही, हे गुहागरवासियांचे दुर्दैव म्हणावे लागेल. गुहागर तालुक्यात कोणत्याही प्रकारचे उद्योगधंदे, प्रकल्प नाहीत. त्यामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात असून नोकरी, व्यवसायासाठी मुंबई, पुणे सारख्या शहरात जाणाऱ्या स्थलांतरीत तरुणांचे प्रमाण मोठे आहे. ग्रामीण भागात बहुसंख्य घरे बंद असून शुकशुकाट आहे. समुद्रकिनारा, निसर्गसौंदर्य लाभलेले असताना व पर्यटन स्थळे विकसित करण्यासारखी पोषक स्थिती असतानादेखील पर्यटन स्थळांचा विकास झालेला नाही, ही येथील राजकीय उदासीनता आहे. तालुक्यात एकमेव असणारा रत्नागिरी गॅस प्रकल्पही सत्ताधाऱ्यांना टिकवता आलेला नाही. स्थानिक तरुणांना या प्रकल्पातून काढण्यात आले तरीसुध्दा याविरोधात आवाज उठविण्याचा प्रयत्न झालेला नाही. गुहागर तालुक्यात उच्च शिक्षणाची वानवाच आहे. साहजिकच त्यामुळे येथील पदवीधर तरुण मोठ्या शहरांची वाट धरतो. सर्वसामान्यांसाठी सुसज्ज रुग्णालय नाहीत. शासकीय रुग्णालयांची अवस्थाही दयनीय आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांचे मोठे हाल होत आहेत. जलजीवनसारख्या कोट्यवधी निधीच्या योजना अजूनही रखडलेल्या आहेत. त्यामुळे कित्येक गावांना ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या झळा बसतात. तालुक्याला मोडकाआगर व पिंपर या गावांसारखी मोठी धरणे लाभलेली असून सुध्दा येथील जलाशयाचा उपयोग इतर गावांना योजना राबवून केला जात नाही, ही मोठी शोकांतिका आहे.अनेक वर्षानंतर गुहागर मतदारसंघ व गुहागर तालुक्यातील जनतेच्या सेवेसाठी प्रमोद सिताराम गांधी यांच्या रूपाने स्थानिक उमेदवार मिळाला असून यावेळी जनता परिवर्तनाच्या बाजूने उभी राहील असा विश्वास प्रमोद गांधी यांनी व्यक्त केला आहे.

**पाणी :** कोकणात सर्वाधिक पाऊस पडूनही योग्य नियोजन अभावी गुहागर मतदारसंघात अनेक गावांना दुष्काळाशी सामना करावा लागत आहे. जानेवारी नंतर येथील विहीर तळ गाठतात, शाश्वत शुद्ध पाणी मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा संविधानिक अधिकार आहे. त्या अनुसरून गुहागर मतदारसंघात नैसर्गिक जल स्त्रोत, पाणवठे, नदी प्रदूषण मुक्त करून पिण्या योग्य नागरिकांना पाण्याचा मुबलक साठा उपलब्ध व्हावे यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना या मतदारसंघाला हवी आहे.महिलांचे आरोग्यविषयी प्रश्न, बचत गटांना योग्य दिशा देण्याबरोबरच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यावर भर दिला जाईल.

**शेती :** आंबा, काजू, कोकम, फणस, नारळ यांसारख्या मुख्य फळांना हमी भाव सहित बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबरोबरच तंत्रज्ञानाच्या युगात शेतकऱ्यांना आधुनिकतेची जोड देऊन शेतीत शेतीपुरक व्यवसाय निर्मती करण्यावर भर देण्यात येईल.

**सुसज्ञ नाट्यगृह :** गुहागर ही कलेची पंढरी, प्रामुख्याने नमन, जाखडी अशा अनेक लोककला आज लोप पावत असताना गुहागर तालुक्यात आज अनेक गाव वाडी कुशीत नमन, जाखडी सारख्या लोककला जोपासण्याचे महान कार्य येथील लोककलावंत व शाहीर मंडळी करत आहेत. अनेक नाट्य लेखक, दिग्दर्शक, निर्माते, आयोजक ह्या गुहागर तालुक्याला लाभले आहेत, गुहागर सांस्कृतिक क्षेत्रात अव्वल स्थान प्राप्त करण्यासाठी सुसज्ज असं अत्याधुनिक नाट्यग्रह उभारण्याचे मानस आहे, यासाठी आपली साथ हवी.

**गाव सुजलाम सुफलाम :** राज्य, देश पातळीवर एक आदर्श गाव म्हणून आपली ओळख निर्माण व्हावी याच उद्देशाने गावात चांगल्या प्रकारे रस्ते बांधणे, रस्त्यांची दुरुस्ती, पथदिवे, गावाची स्वच्छता, सांडपाण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याचा योग्यप्रकारे पुरवठा, शिक्षण तसेच आरोग्यविषयक सोयी पुरवणे, शेती विकास, पशुधन सुधारणा यावर भर देऊन गाव सुजलाम सुफलाम करण्याचे ध्येय.! मुख्य रस्ते, मुख्य बाजारपेठा, बस थांबे व रिक्षा स्टैंड, गर्दीचे ठिकाण यांचा विकास करणार आहे.

**शेड :** उन्हाळा व पावसापासून संरक्षण व्हावे यासाठी बस थांबे व शेड उभारणी.

**जेष्ठ नागरिकांना आधार :** ज्येष्ठ नागरिकांसाठी बगीचा आणि विरंगुळा केंद्र सुरु करण्याचा मानस आहे. नोकरी निम्मिताने बाहेर असल्याने अनेक ज्येष्ठ नागरिकांना आधार देण्यासाठी घरी कोणी नसत ते एकटे असल्याने त्यांच्या सुरक्षित्तेचा आणि आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यांना आधार देण्यासाठी ठोस उपाययोजना रबविणार आहे. ज्या लोकांच्या पेन्शन काही कारणास्तव बंद झाल्या आहे, त्या सुरु करण्यासाठी पाठपुरावा करणार आहे.

## बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त खोडाळा येथे अभिवादन

**अक्षराज : सौरभ कामडी**



**दि.१७, मोखाडा :** हिंदूहृदयसम्राट शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त खोडाळा येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रदीप वाघ यांनी सांगितले की, वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या ८०% समाजकार्य व २०% राजकारण या तत्वावर आपण राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम केले पाहिजे. तसेच अन्याय विरुद्ध लढताना न डगमगता ताट मानाने लढा दिला पाहिजे. महाराष्ट्र व भारत देशातील तमाम मराठी जनतेच्या हृदयात बाळासाहेब सैदव असणार आहेत.

यावेळी प्रदीप वाघ, प्रभाकर पाटील, निलेश झुगरे, संजय वाघ, देवीदास पेहरे, मंगेश दाते, नंदकुमार वाघ, प्रितम लहामगे, सुरेश पाटील, रमेश बोटे, अंकुश बोटे, दिनेश ठोमरे, भाऊ दोरे, अशोक वाघ, किरण येले, प्रतिक लहामगे, अक्षय कोरडे, निलेश ठोमरे, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## दुर्भा येथील हत्येशी संबंधित ४ आरोपींना पकडण्यात यश

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.१७, झरी (यवतमाळ) :** दुर्भा गावाजवळ काही अंतरावरील पूलाजवळ एका ईसमाची हत्या करण्यात आली. त्या हत्येच्या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु पाटन पोलिसांनी तात्काळ पोलिस यंत्रणेचा वापर करीत वेगाने तपास चक्र फिरविले आणी घटनेतील खुनाचा तपास सुरू केला. आणि अव्यघ्या २४ तासांच्या आत ४ आरोपींना स्थानिक. गु. शाखा पोलिस पथकाने अटक केली आहे.

खुनाचा मुख्य सुत्रधार दुर्भा येतीलच नवन अशोक बदमवार याला पोलिसांनी नांदेड येथील रेल्वे स्थानकावरून ताब्यात घेतले. मुख्य आरोपी नवन अशोक बदमवार पुणे येथे पळून जाण्याच्या तयारीत होता. अशी माहिती समोर आली आहे. एसीबीच्या पथकाने तातडीने तपास चक्र फिरवून २४ तासांच्या आत खुनाच्या घटनेशी संबंधित सर्व आरोपींना अटक केली. अटक केलेल्या आरोपींमध्ये अरूण रामदास झांबरे (२५)रा. पिंपळगाव (ईजारा) ता. महागाव, अनिल कैलाश अवशे (२९) रा.हिवाळणी काली दौलत ता. महागाव, कैलाश प्रकाश बोडके (२५) रा.हीवाळणी काली दौलत ता महागाव व मुख्य आरोपी नवन अशोक बदमवार (२९) रा.दुर्भा ता. झरी असे आरोपींचे नावे आहेत. पण अजून कोणत्या कारणामुळे खुन केला याबद्दल माहिती समोर आली नाही.

या घटनेच्या आरोपींचा तपास करण्यासाठी पोलिस अधीक्षक कुमार चीता, अपर पोलीस अधीक्षक पीयूष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी वणी गणेश किंद्रे यांचे मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलिस निरिक्षक ज्ञानोबा देवकते, एपीआय अजय कुमार वाढवे, पीएस आय धनराज हाके, हेड कॉंनस्टेबल रजनीकांत मडावी चालक योगेश टेकाम या एलसीबीच्या पथकाने हत्येच्या घटनेतील आरोपींना पकडण्यात कामगिरी बजावली आहे.

## घराणेशाही संपवण्यासाठी स्वाभिमानी खंडाळा तालुक्याने साथ द्यावी : पुरुषोत्तम जाधव

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१७, खंडाळा (सातारा) :** वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघातील घराणेशाही व मस्तवाल सत्ताधाऱ्यांना पराभूत करण्यासाठी आता खंडाळा तालुक्यातील स्वाभिमानी जनतेने माझ्यासारख्या सामान्य शेतकरी,वारकरी कुटुंबातील उमेदवाराला साथ द्यावी. खंडाळा तालुक्यातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न, बेरोजगारांच्या नोकरीचा प्रश्न सोडविण्यासाठी एकजुटीने पाठीशी राहा अशा वाहन वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांनी भादे ता. खंडाळा येथील प्रचार सभे दरम्यान व्यक्त केले.

अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांनी पिसाळवाडी, धनगरवाडी, माने कॉलनी,भोळी, शेखमिरवाडी लोणी,तोंडल, भादे,वाठार,शेडगेवाडी,अंदोरी, भाऊकलवाडी,मरीआचीवाडी, पिंपरी, पाडेगाव, लोणंद येथे जाऊन प्रत्यक्ष मतदारांच्या गाठीभेटी घेऊन तेथील प्रश्न जाणून घेतले. यावेळी पुरुषोत्तम जाधव पुढे म्हणाले, विद्यमान आमदार यांनी कधीही वाई खंडाळा महाबळेश्वरच्या विकासासाठी विधिमंडळात आवाज उठवला नाही.कार्यक्षमता नसलेले लोकप्रतिनिधी गेल्या पन्नास वर्षात खंडाळा तालुक्यातील पूर्व भागातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडवू शकले नाहीत. वाई खंडाळा तालुक्यातील हक्काचे पाणी दुसऱ्या जिल्ह्यात गेले मात्र आपला खंडाळा तालुका मात्र कोरडाच राहिला.आपल्या मतदारसंघात तीन-तीन जलसिंचन योजना असून त्याला योग्य तो निधी मिळत नाही याला जबाबदार कोण? खंडाळा तालुक्यातील स्वाभिमानी जनतेने आता विद्यमान आमदारांना घरी बसवावे व आपल्या सुखदु:खात असणाऱ्या माणसाला साथ द्यावी.शिरवळ, खंडाळा येथील औद्योगिक विकासाला चालना देऊन स्थानिक भूमिपुत्रांना नोकरी व्यवसायासाठी प्रेरित करण्याची गरज असताना मूकनायक आमदार मात्र कोणतेही काम करताना दिसत नाहीत.

सर्व सत्ता एकाच घरात घेऊन सामान्य नागरिकांच्या वर दबाव निर्माण करण्याचे षडयंत्र सध्या मतदारसंघात सुरू असून २० तारखेला सामान्य मतदार वाई,खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघात क्रांती घडवेल असा विश्वास पुरुषोत्तम जाधव यांनी यावेळी व्यक्त केला.



**पुरुषोत्तम जाधव यांच्या प्रचारासाठी संपूर्ण कुटुंबाची मतदारसंघात भिंगरी**

वाई-खंडाळा-महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांच्या प्रचारासाठी त्यांचे संपूर्ण कुटुंब त्यांच्या पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा संपूर्ण परिवार प्रत्येक गावात जाऊन प्रत्यक्ष मतदारांच्या गाठीभेटी घेत आहे.

## अपहरणानंतर तासाभरात शासकीय ठेकेदाराचा निर्घृण खून

**दि.१७, पुणे :** सिंहगड पायथा परिसरात फिरायला गेलेले शासकीय ठेकेदार विठ्ठल पोळेकर यांचे अपहरण केल्यानंतर तासाभरात त्यांचा आरोपींनी खून केला. त्यांच्या मृतदेहाचे तुकडे करुन आरोपींनी खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात टाकून दिल्याचे उघडकीस आले आहे. पोळेकर खून प्रकरणाता आतापर्यंत तिघांना अटक करण्यात आली असून, मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू आहे.

सिंहगड पायथ्याजवळील डोणजे गावात विठ्ठल सखाराम पोळेकर (वय ७०) राहायला होते. गुरुवारी सकाळी ते नेहमीप्रमाणे सिंहगड पायथा परिसरात फिरायाल गेले होते. ते घरी न परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. पोळेकर याचे अपहरण करुन खून करण्यात आल्याचे तपासात उघडकीस आले. याप्रकरणी ग्रामीण पोलिसांनी शुभम पोपट सोनवणे (वय २४, रा. चिंचोली गुरव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर), मिलिंद देविदास थोरात (वय २४, रा. बेळगाव, कर्जत, जि. अहिल्यानगर), रोहित किसान भामे (वय २२, रा. डोणजे, ता. हवेली) यांना अटक करण्यात आली आहे. मुख्य आरोपी योगेश उर्फ बाबू किसन भामे (वय २४, रा. डोणजे, ता. हवेली) पसार झाला आहे. आरोपी रोहित हा त्याचा भाऊ आहे. आरोपी शुभम आणि मिलिंद हे सिंहगड पायथा परिसरातील एका हॉटेलमध्ये कामाला आहेत. त्यांना पैशांचे आमिष दाखवून योगेश भामेने पोळेकर यांचा खून घडवून आणल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे, अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली. अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे यावेळी उपस्थित होते.

**पोळेकरांचा खून कशामुळे ?**

शासकीय ठेकेदार पोळेकर यांनी पायगुडेवाडी ते गोळेवाडी रस्त्याच्या कामाचा ठेका घेतला होता. या कामात अडथळा आणण्याची धमकी देऊन मुख्य आरोपी योगेश भामेने त्यांच्याकडे महागडी मोटार, तसेच दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. खंडणी न दिल्यास पोळेकर आणि त्यांचा मुलगा प्रशांत यांचा खून करण्याची धमकी त्याने दिली होती त्यांचा खुनामागचे नेमके कारण काय आहे, यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. पोळेकर यांच्या खूनामागे कौटुंबिक वाद आहेत का? , यादृष्टीने तपास सुरू आहे. याप्रकरणात तिघांना अटक करण्यात आली असून, चौकशीत खूनामागचे निश्चित कारण समजू शकेल, असे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी सांगितले.

अक्षराज

# कोयना बस स्थानकात खड्डेच खड्डे !

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१७, पाटण (सातारा) :** महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी ठरलेल्या कोयना धरण नजीक असलेल्या कोयना बस स्थानकाची दयनीय अवस्था झाली आहे. या बसस्थानकातील रस्त्याची दुरवस्था कोयनेची प्रतिष्ठा या बसस्थानकावर बाहेरुन येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला दाखवत आहे.



कोयना सध्या धरणामुळेच नावाला राहिली असताना येथील पुढाऱ्यांना कोयनेची झालेली बिकट अवस्था का दिसत नाही. केवळ निवडणुका जवळ आल्या की सुशोभित कोयनेचे स्वप्न दाखवणाऱ्या पुढाऱ्यांना विधानसभा निवडणुकीत मतदार जागा दाखविल्याशिवाय शांत बसणार नाही. अशा संतप्त प्रतिक्रिया सुज्ञ नागरिकांच्या येत आहेत. एकेकाळी कोयना हे कोयना धरणामुळे पर्यटनाचे केंद्र बिंदू म्हणून ओळखले जात होते. पर्यटकांचा मोठा राबता कोयना परिसरात व बस स्थानकात दिसत होता.

या पर्यटकांमुळे बस स्थानक परिसरातील व कोयना परिसरातील छोट्या-मोठ्या उद्योग व्यवसायकांना, बोटींग व्यवसाय, मासेमारी व्यवसाय, हॉटेल व्यवसाय, रिक्षा चालकांना व्यवसाय उपलब्ध होत होता. दिवसेंदिवस या व्यवसायात वाढ होत असताना कोयनेच्या प्रगतीला वाईट नजर लागली. आणि गेल्या पंधरा वर्षांपूर्वी कोयना धरणाच्या सुरक्षिततेचे कारण पुढे लावून पर्यटनाचा मुख्य व्यवसाय असणाऱ्या बोटींग आणि मासेमारी व्यवसायावर बंदी आणली. तेंव्हापासून कोयनेच्या वैभवाला ग्रहण लागल्याची भावना येथील नागरिक बोलून दाखवत आहेत.

कोयना बसस्थानकात केवळ येणाऱ्या -जाणाऱ्या बसेस लागतात पण पर्यटक कधी उतरताना दिसत नाहीत. किंवा पर्यटकांची खाजगी वाहने देखील या परिसरात क्वचित कधीतरी पाहायला मिळतात.

या बस स्थानकाची अवस्था दयनीय झाली असून रस्ता जागोजागी उखडला गेला आहे. मोठ्या प्रमाणात खड्डेच खड्डे सगळीकडे झाले आहेत. यामुळे वाहनांच्या नुकसानी बरोबर लोकांचे आरोग्य देखील धोक्यात आले आहे. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे व डबऱ्यामुळे बसस्थानक परिसरात धुरळ्याचे लोट उडत आहेत. याचा त्रास लहानपणापासून मोठ्या पर्यंत होत असताना कोयना परिसरातील पुढारी व त्यांचे नेते मात्र निवडणूका आल्या की अलर्ट होऊन कोयनेला गतवैभव प्राप्त करून देण्याचे आश्वासन देत आहेत.

### खड्ड्यात नुसती माती आणून टाकतात

कोयना बसस्थानक परिसरात सफाई कामगार आजीने बोलताना सांगितले गेल्या तीन वर्षांपासून बसस्थानकाची ही अवस्था झाली आहे. पण याकडे कोणीही बघत नाहीत. पडलेल्या खड्ड्यात नुसती माती आणून टाकतात याच्यापलिकडे काहीच करत नाहीत. डांबरीकरण करणार म्हणून नुसते सांगत आहेत. आता बघुयात कधी होतय.

**– सफाई कामगार आजी**

# लाडकी बहिणंच-बहीणीला मतदान करणार

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१७, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभेच्या निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या टप्यात महाविकास आघाडीच्या पारनेर नगर विधान सभेच्या निवडनुकीला उभ्या असलेल्या राणीताई लंकेच, लाडक्या बहीणीला बरोबर घेऊनच पहिल्या महीला आमदार होणार आसल्याचं चित्र समोर दिसत आहे. विरोधकांनी विकास कामावर टिका करण्यापेक्षा व्यक्तीगत टिका चालू केली आहे.



खासदार साहेबांनी तालुक्यातील प्रत्येक गावात विकास कामे केलेली आहे ही जमेची बाजु आहे. हे सर्व तालुक्यातील जनतेला माहीत आहे. विरोधक विकास कामावर टिका करु शकत नाहीत.

आजचा उमेदवार म्हणून राणीताई या जिल्हा परिषद सदस्य आसतांना ही विकास कामात नेहमी अग्रेसर राहील्या आहेत.सर्व सामान्य जनतेची आसणारं नेतृत्व म्हणजे राणीताई, आजही लाडकी बहीणीला बरोबर घेऊनच पारनेर नगर विधान सभेची निवडणूक लढवित आहे.

सर्व सामान्य बहीणच बहीणीला मतदान करुन पारनेर नगर विधान सभेवर नेतृत्व करण्यासाठी पहीली महीला आम ची बहीणच पाठवणार आहे.

सर्व सामान्यांच मत पारनेर तालुक्यातील खासदार आणि पारनेर तालुक्यातीलच आमदार म्हणुन राणीताई निवडुन गेल्यावर पारनेर नगर विधान सभेच्या कार्यक्षेत्रातील सर्वच गावे, वाड्या, वस्त्यावर विकासाचा डोंगर उभा राहील्याशिवाय राहणार नाही. विरोधकांनी कोणत्याही प्रकारची टिका केली तरी पारनेर तालुक्यातील जनतेला हमी देणारं नेतृत्वाची खात्री झालेली आहे.

म्हणुन तालुका प्रमुखापासुन तर आमदार नंतर खासदारकी पर्यंत विश्वास गमवलेला नाही. आजचा मतदार, हा पुढारी, नेता, पक्ष, संघटना यांच्या मागे नसुन उमेदवार कोण आहे,हे पाहुनच मतदार मतदान करणार आहे. विकास कामाची हमी देणारं नेतृत्वाची गरज आज तालुक्याला आहे.

ती खात्री पारनेर नगर तालुक्यातील जनतेला आली आहे. म्हणुन पारनेर नगर विधान सभेच्या निवडनुकीत लाडकी बहीणंच बहीणीला मतदान करणार आहे असे संग्राम इकडे यांनी सांगितले.

# मतदान केंद्रांच्या २०० मीटर त्रिज्येमध्ये उमेदवारांना बुथ उभारण्यावर बंदी

## जिल्हाधिकार्यांनी काढले आदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** मतदान केंद्राच्या बाहेर २०० मीटर त्रिज्येमध्ये उमेदवारांचे निवडणूक बूथ उभारण्यात येऊ नयेत असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले आहेत.

मतदान केंद्राच्या बाहेर २०० मीटर त्रिज्येमध्ये उमेदवारांचे निवडणूक बूथ उभारण्यात येऊ नयेत. एकाच इमारतीत किंवा आवारामध्ये अनेक मतदान केंद्रे असल्यास अशा सर्व मतदान केंद्राकरिता मिळून केवळ एक निवडणूक बूथ प्रत्येक उमेदवाराकरिता २०० मीटर त्रिज्येच्या बाहेर उभारता येईल.

प्रत्येक निवडणूक बूथवर केवळ १ टेबल व २ खुर्चा तसेच १० बाय १० फूट पेक्षा मोठा मंडप नसेल असा छोटा तंबू उभारता येईल. निवडणूक बूथ उभारण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी, आवश्यकतेनुसार शासकीय प्राधिकरणे तसेच स्थानिक प्राधिकरणे यांच्या परवानग्या घेणे आवश्यक राहील. निवडणूक बूथ उभारल्यामुळे सार्वजनिक किंवा खाजगी मालमत्तेचे अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी आणि बूथ धार्मिक जागेमध्ये किंवा परिसरात उभारण्यात येऊ नये.

निवडणूक बूथ शैक्षणिक संस्था किंवा रुग्णालयाच्या परिसरात उभारण्यात येऊ नये. अशा निवडणूक बूथवर पक्षाचा ध्वज आणि पक्षाचे चिन्ह लावता येणार नाही. निवडणूक बूथचा वापर मतदारांना केवळ अशासकीय मतदार माहिती चिठ्ठ्या देण्याच्या कारणास्तव करता येईल.

मतदार माहिती चिठ्यांवर राजकीय पक्षाचे नाव तसेच उमेदवाराचे चिन्ह असू नये. निवडणूक बूथवर उपस्थित व्यक्तींकडून मतदानाकरिता येणार्या मतदारांना कोणताही अडथळा किंवा प्रभाव होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. मतदान केंद्रापासून २०० मि. परिसरात कोणताही प्रचार अनुज्ञेय नाही. निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक तसेच निवडणुकीसाठी प्राधिकृत निवडणूक पोलिस कर्मचारी वगळता कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघामध्ये तसेच मतदान केंद्रामध्ये मोबाईल फोन, वायरलेस सेट नेण्यात प्रतिबंध आहे.

गुन्हेगारी घटनेशी संबंधित व्यक्तींना निवडणूक बूथवर नियुक्त केले जाणार नाही, याबाबतची दक्षता राजकीय पक्ष आणि उमेदवाराने घेणे आवश्यक आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३४ (ब) नुसार या कलमाद्वारे परवानगी दिलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस मतदान केंद्रामध्ये किंवा त्या परिसरात शस्त्र घेऊन जाण्यास किंवा शस्त्र दाखविण्यास प्रतिबंध आहे, असे जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

# टेंभुर्णी येथे शरद पवारांची विद्यमान आमदारांवर जोरदार प्रहार

## अभिजीत पाटलांचे पाठीशी राहण्याचे केले आवाहन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१७, पंढरपूर :** माढा तालुक्यात इतकी वर्ष साथ दिली म्हणतात त्याचं काय करायचं असा सवाल उपस्थित करत शरद पवार म्हणाले, जे कोणी असतील सख्खे भाऊ असतील अथवा आणखी कोणी असतील एकदा रस्ता चुकला की गड्याला त्याची जागा दाखवलीच पाहिजे. त्यांची जागा दाखवायची असेल तर उद्याच्या निवडणुकीत साध सुध पाडायचं नाही जोरात पाडायचं संपूर्ण राज्यात संदेश गेला पाहिजे. सगळ्यांचा नाद करायचा पण.... अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी माढ्याचे विद्यमान आमदार बबन शिंदे यांचे नाव न घेता समाचार घेतला.महाविकास आघाडीचे माढ्यातील उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचाराची टेंभुर्णी येथे शरद पवार यांची जाहीर सभा झाली. त्या सभेत शरद पवारांनी साथ सोडणाऱ्या आमदार बबनराव शिंदे यांच्यावर चौफेर टीका केली.

यावेळी त्यांनी नाव न घेता शिंदे यांना पराभूत करा असे आवाहन केले. यावेळी ते पुढे म्हणाले मला सोडून गेलेली ही मंडळी काही दिवसांनी पुन्हा माझ्याकडे यायला लागली. मी विचारलं काय झालं तर म्हणालं आमचं चुकलं मी म्हटलं अनेक वर्ष आपले सहकारी आहेत. चुकलं असेल तर चुका पोटात घेऊ त्यांना संधी देऊ जे काही करता येईल. ते करण्यासाठी मदत करू तिकीट मागण्यासाठी माझ्याकडे एकदा नव्हे तर पाचदा आले. मी सांगितलं बबन दादा जरा नव्या लोकांना संधी देण्याचा विचार करू नव्या लोकांचा विचार करू म्हटल्यानंतर त्यांच्या डोक्यात एकच नाव होतं ते म्हणजे त्यांचा लेक दुसरा काय कोणी त्यांना दिसतच नव्हतं पुन्हा पुन्हा ते येत होते तिकिटासाठी आग्रह करत होते. काही करून मला संधी द्या अशी मागणी करत होते. मी एवढेच म्हटलं उद्या संकट आली ईडी सीबीआयची नोटीस आली तर तुम्ही आहे. तिथे राहणार की पुन्हा परत जाणार त्यावर ते काही बोलले नाहीत. उठून गेले असेही पवारांनी सांगितले. काही दिवसानंतर ते सांगायला लागली की मी ४० वर्षे शरद पवारांसोबत आहे. तुम्ही ४० वर्षे माझ्यासोबत आहात. याचा अर्थ ४० वर्षे मी तुम्हाला मदत केली.

जी काम सांगितलं त्या कामाला मदत केली. सीना माढा उपसा सिंचन योजनेला निधी देण्याचा रस्ता मी त्यांना दाखवला विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला मदत केली. ते जे प्रश्न सांगतील त्यात मदत करण्याची भावना ठेवली. माझी अपेक्षा अशी होती की संकटाच्या काळात हे कुटुंब आपल्याबरोबर राहील पण बघितलं प्रसंग आला. आणि एक करमाळ्याला पळाला दुसरा माढ्याला पळाला मोठी गंमत आहे. काय कशाचे समजत नाही. परिस्थिती थोडीशी कमी जास्त झाली तर हे पट्टे गायब होतात हे समजत नाही संकटात हे खंबीरपणे उभे राहणारे तुमच्या मतदारसंघातील उमेदवार अभिजीत पाटील यांना साथ द्यायची की आणखी कोणाचा विचार करायचा हे आता ठरवण्याची वेळ आली आहे.

या निवडणुकीत अभिजीत पाटील यांचेसह

मोहोळ, पंढरपूर, माळशिरस मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्य देण्याचे आवाहन त्यांनी केले. यासहलोकसभा निवडणुकीला मी उभे राहिल्यानंतर माढा तालुक्यातील जनतेने मला भरभरून मत दिली आणि विक्रमी मतदान केलं. त्याचा विसर मला कधी पडणार नाही. त्या भावनेने मी इथल्या कामात लक्ष घातलं असे ही त्यांनी स्पष्ट केले.

# थोडक्यात

## महाराष्ट्र विद्यालय खापरखेडाद्वारे मतदान जनजागृती अभियान



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील महाराष्ट्र विद्यालय खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने SWEEP या उपक्रमाअंतर्गत भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार खापरखेडा परिसरात मतदान जनजागृती मोहिमेअंतर्गत विद्यालयातर्फे विविध कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आलेत. यात मतदारांमध्ये मतदान करण्याबाबत जनजागृती व्हावी. या उद्देशाने विद्यार्थ्यांकरिता मतदार जनजागृती पर विषयावर चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, तसेच स्लोगन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता खापरखेडा नगर मध्ये नागरिकांना मतदानाविषयी जागरूकता निर्माण व्हावी या हेतूने प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा उस्फूर्तपणे सहभाग होता. तसेच या प्रभात फेरी दरम्यान मुख्य चौका चौकात विद्यार्थ्यांद्वारे गावामध्ये मतदान जनजागृतीवर आधारित दोन पथनाट्ये सादर करण्यात आली. तसेच परिसरात लेझीमचे सादरीकरण सुद्धा करण्यात आले. शासन निर्देशानुसार विद्यालयात पालक सभेचे आयोजन करून लोकशाहीचे महत्त्व पटवून देताना उपस्थित पालकांनी शंभर टक्के मतदानासाठी पुढाकार घेण्याची प्रतिज्ञा घेतली. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर उपमुख्याध्यापक चंद्रशेखर लिखार पर्यवेक्षक प्रमोद ईखे पद्माकर राऊत, प्रा.विजय टेकाडे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## ड्रोनच्या साह्याने पोलिसांची टेहाळणी

### निवडणुकीत शांतता भंग करणाऱ्यांवर पोलिसांचा वचक

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७, डोंबिवली (ठाणे) :** पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या संकल्पनेतून तसेच अप्पर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) जाधव आणि पोलीस उपायुक्त (परिमंडळ ३) अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक पोलीस ठाण्याला त्यांच्या हद्दीत ड्रोनद्वारे टेहाळणी करण्याच्या सूचना देण्यात आले होते. याच अनुषंगाने, दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ रोजी सपोआ डोंबिवली विभागाचे सुहास हेमाडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार, आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) गहिनीनाथ गमे यांच्या नेतृत्वाखाली विष्णूनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शास्त्रीनगर, सिद्धार्थनगर, आणि कोपर या भागांमध्ये ड्रोनच्या साह्याने टेहाळणी करण्यात आली. ही कारवाई निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांना वचक बसवण्यासाठी आणि शांतता राखण्यासाठी करण्यात आली आहे. या कारवाईतून स्पष्ट संकेत देण्यात आला आहे की, निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, आणि अशा व्यक्तींना थेट तुरुंगात पाठवले जाईल. ड्रोनच्या टेहाळणीमुळे पोलीस विभाग गुन्हेगारांवर बारीक लक्ष ठेवत असून शांततेसाठी कोणताही अपवाद केला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.



## राजेंद्र विद्यालय, खंडाळाच्या खो-खो संघाने अजिंक्यपद पटकावले

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१७, खंडाळा (सातारा) :** राजेंद्र विद्यालय, खंडाळा येथील खो- खो संघाने डेरवण, जि.रत्नागिरी येथे झालेल्या राज्यस्तरीय १४ वर्षाखालील खो- खो स्पर्धेत अंतिम सामन्यात धाराशिव या संघावर मात करून अजिंक्यपद पटकावले व इतिहास घडवला. सर्व सहभागी खेळाडू व महाराष्ट्र संघात निवड झालेले स्वराज उत्तेकर, वरद पोळ, प्रतिक खंडागळे, स्वराज गाढवे यांचा खंडाळा विभाग शिक्षण समिती संस्थापक अध्यक्ष शंकरराव गाढवे, सचिव अनिरुद्ध (संजीव) गाढवे, प्राचार्य शब्बीर नालबंद, संचालक वसंतराव पंडित,संचालिका तथा उपप्राचार्य अरुंधती गाढवे मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थी व क्रीडा शिक्षक व्ही.एन.गाढवे, वसंत राऊत, प्रशिक्षक डी.जी गाढवे, महेंद्रकुमार गाढवे, दिग्विजय खंडागळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय प्राचार्य डॉ.हणमंत जाधव, कार्यालय अधीक्षक संतोष गाढवे, ग्रंथपाल हणमंत यादव, सर्व प्राध्यापक वृंद यांच्याकडून खेळाडूंना राष्ट्रीय व राज्य स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## सी-व्हिजिल ॲपवरील तक्रारींचे जलदगतीने निराकरण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, ठाणे :** निवडणुकीच्या दरम्यान अनियमितता किंवा आचारसंहिता भंगाविषयी काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास नागरिकांनासी व्हिजिलया ॲप्लिकेशनच्या माध्यमातून संदेश, फोटो, व्हिडिओद्वारे ऑनलाईन तक्रार दाखल करण्याची सुविधा निवडणूक आयोगाने उपलब्ध करून देण्यात आली आहे. या ॲपवर तक्रार प्राप्त झाल्यापासून १०० मिनिटांच्या आत तक्रारीचे निवारण केले जाते.या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात दि.१७ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ०६ वाजेपर्यंत १ हजार ६२७ तक्रारी प्राप्त झाल्या. या १ हजार ६२७ तक्रारींमध्ये एकूण १ हजार ५०८ तक्रारी दखलपात्र असून उर्वरित १०९ तक्रारी अदखलपात्र आहेत.

या १ हजार ५०८ दखलपात्र तक्रारींमधून १ हजार ३९९ तक्रारींचे १०० मिनिटांच्या आत निराकरण करण्यात आले असून उर्वरित तक्रारींचेही निराकरण करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही सुरू आहे. अशी माहिती सी-व्हिजिल कक्षाचे जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी विजयसिंह देशमुख व सहाय्यक समन्वय अधिकारी सुकेशिनी पगारे यांनी दिली आहे.